बुधवार, ८ सप्टेंबर २०२१

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ५३
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## चिपी विमानतळाचे ९ ऑक्टोबरला उद्घाटन



**मुंबई :** केंद्रीय उद्योगमंत्री नारायण राणे यांनी सिंधुदुर्गातील चिपी विमानतळाबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. चिपी विमानतळ बांधून तयार आहे. ९ ऑक्टोबर रोजी या विमानतळाचे उद्घाटन केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या हस्ते केले जाणार आहे. त्या दिवसापासून विमानसेवा सुरू होईल, असे मंत्री राणे यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, या संदर्भात क्रेडिट घेण्याचा प्रश्नच नाही. मी २०१४ सालापर्यंत विमानतळ बांधून पूर्ण केले. आम्ही स्थानिक असल्याने आणि विमानतळ बांधल्याने त्याचे उद्घाटन आमचा अधिकार आहे. पर्यटन जिल्हा आम्ही जाहीर केला. कुणी श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू नये. शिवसेना कोणत्या आधारावर बोलते हे माहीत नाही. मी ज्योतिरादित्य सिंधिया यांना सकाळी भेटलो आणि त्यांच्याकडून विमानतळ उद्घाटनाची वेळ घेतली आहे.


**अंतरंग**

पनवेल महापालिकेने ओलांडला पाच लाख लसीकरणाचा टप्पा/२

खालापुरात शेतकऱ्याच्या परवानगीविना जमीन विक्री/४

जागतिक शरीरसौष्ठव स्पर्धा : अलिबागच्या सचिनची निवड/६


# कोकणासह राज्यात जोर‘धार’

**मुंबई : प्रतिनिधी**

**हवामान खात्याने महाराष्ट्राला दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यानुसार कोकणात सोमवार (दि. ६) रात्रीपासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली असून रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांत पाणी साचले. जोरदार पावसाचा फटका मराठवाडा आणि विदर्भालाही बसला. राज्यात आणखी काही दिवस पाऊस सक्रिय राहण्याचा अंदाज आहे.**

**रायगडला रेड अलर्ट**

कोकणात पावसाचा जोर रत्नागिरीतील चिपळूण आणि संगमेश्वरमध्ये अधिक आहे. चिपळूणमध्ये वाशिष्ठी नदीच्या पाणीपातळीत वाढ होऊ लागली आहे, तर संगमेश्वर तालुक्यातील गड नदीला पूर येऊन हे पाणी माखजन बाजारात घुसले. त्यामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान झाले आहे. अशातच रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे गेल्या चार दिवसांत वेगवेगळ्या घटनांमध्ये १२ जणांचा मृत्यू झाला आहे. बीडमध्ये चार, नांदेड तीन, औरंगाबादेत दोन आणि हिंगोली, लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यात प्रत्येकी एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, तर ६६४ लहान-मोठी जनावरे दगावली आहेत. याशिवाय ४१ घरांची पडझड झाली आहे. विदर्भातही पाऊस पडतोय.

## मुरूडमध्ये ढगफुटी

### अनेक घरांत शिरले पाणी, बोटी बुडाल्या



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात अवघ्या १३ तासांत ४७५ मिलीमीटर एवढा विक्रमी पाऊस पडला असून या ढगफुटीसदृश पावसामुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरले, तर दोन बोटी बुडाल्या. यामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

रविवारी रात्री ८ वाजता मुसळधार पावसाला सुरुवात झाली. हा पाऊस सलग दुसऱ्या दिवशी सुरूच राहिल्याने मुरूड शहरातील लक्ष्मीखार परिसरात अनेक घरांत पाणी घुसले. येथील परिसरात प्रत्येकाच्या घरात चार फूट पाणी शिरले होते. त्यामुळे लोकांना रात्र जागून काढावी लागली, तर शहरातील सुर्वे नाका, गोल बंगला परिसर व अन्य ठिकाणीही पाणीच पाणी होते.


याशिवाय उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील खारीक वाडा, वाळवंटी, उसरोली, खारदौडकुले, आदाड या भागांतील घरात पाणी शिरले होते. आदाड येथील गणपती मंदिरात चार फूट पाणी होते. लोकांच्या घरात पाणी शिरल्याने जीवनोपयोगी वस्तूंचे नुकसान झाल्याची माहिती उसरोली ग्रामपंचायतीचे सरपंच मनीष नांदगावकर यांनी दिली. या भागात जास्त पाऊस पडल्यावर नेहमीच घरात पाणी शिरण्याचे प्रमाण वाढले आहे, तरी महसूल प्रशासनाने या भागाची पाहणी करून असे का घडते यासाठी ठोस उपाययोजना करून येथील ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

मुरूड शहराजवळ असणाऱ्या एकदरा पुलाजवळ सर्व मच्छीमार आपल्या बोटी दोरीच्या साह्याने बांधून ठेवत असतात, मात्र रात्रीच्या वेळी अचानकपणे पावसाचा वेग वाढल्याने एकदरा खाडीतील पाण्यात प्रचंड प्रमाणात वाढ होऊन चार बोटींचे दोरखंड तुटले. यातील दोन बोटी बुडाल्या, तर दोन बोटी महत्प्रयासाने किनाऱ्याला आणण्यात आल्या.

पावसामुळे साळाव-मुरूड रस्त्यावर दरड कोसळली. त्यामुळे काही तासांसाठी वाहतूक बंद झाली होती. याबाबतची माहिती महसूल प्रशासनाला मिळताच साळाव येथील जेएसडब्ल्यू कंपनीकडून जेसीबी घेत येथील मलबा हटवण्यात आला.

## बोर्ली बाजारपेठही गेली पाण्याखाली

**रेवदंडा :** मुसळधार पावसामुळे डोंगरातून वाहून आलेल्या पाणी व मातीमुळे बोर्ली बाजारपेठ



उद्ध्वस्त होऊन व्यापारी वर्गाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे साळाव चेकपोस्ट येथे रात्री दरड कोसळली, तर येसदे ते शिरगाव रस्त्यावरही पाणी व माती यांचा चिखल तयार होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण झाला.

मुरूड तालुक्यातील येसदे, साळाव, सुरई डोंगर भागात सोमवारी रात्री अतिवृष्टी झाल्याने हे पाणी मातीसह शिरगाव ते बोर्ली या मुख्य रस्त्यावर प्रचंड वेगात येऊन चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले होते. याचा फटका बोर्ली बाजारपेठेला बसला. या ठिकाणी अंदाजे सहा फुट पाणी घुसले होते. त्यातच परिसरात वीजपुरवठा खंडित झाल्याने आणि मोबाइल टॉवरचा संपर्क तुटल्याने बाहेरील लोकांशी संपर्क करणे कठीण झाले होते. मंगळवारी पहाटे चार ते पाच वाजता पाऊस उघडला, पण डोंगरातून पाणी व मातीचे मिश्रण दुपारी १२ वाजेपर्यंत येणे सुरू होते. त्यामुळे या मुख्य रस्त्याने वाहतूक करणे तारेवरची कसरत करण्यासारखे होत होते. **(अधिक वृत्त पान ५ वर..)**

## माथेरान गिरीक्षेत्रात साहसी खेळासाठी परवानगी द्यावी

### आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांची केंद्रीय पर्यटनमंत्री जी. किशन रेड्डी यांच्याकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माथेरान गिरीक्षेत्र येथे साहसी खेळास परवानगी मिळावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय पर्यटनमंत्री जी. किशन रेड्डी यांच्याकडे मंगळवारी (दि. ७) दिल्ली येथे केली. या संदर्भात मंत्री रेड्डी यांना निवेदनही देण्यात आले.

या वेळी चर्चा करताना आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी मंत्रीमहोदयांना सांगितले की, महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात असलेले माथेरान गिरीस्थान हे जगातील एक सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. **(पान २ वर..)**





**पनवेल : मुंबईचे माजी नगरपाल डॉ. जगन्नाथराव हेगडे यांनी मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या वेळी लायन्स क्लब ऑफ मुंबई मिडटाऊनचे अध्यक्ष विजय रायमाने, ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे उपस्थित होते.**

## निवडक

### ‘सीईटी परीक्षेनंतर कॉलेज सुरू करण्याबाबत निर्णय’

**मुंबई :** सीईटी परीक्षा झाल्यानंतर राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे. या वेळी त्यांनी सीईटी परीक्षेच्या तारखाही जाहीर केल्या. १५ ते १० ऑक्टोबर या कालावधीत सीईटी परीक्षा घेतली जाणार आहे. यंदा ऑनलाईन पद्धतीने ही परीक्षा होईल.

### तमिळनाडूमध्ये ३० विद्यार्थी, शिक्षक कोरोना पॉझिटिव्ह

**चेन्नई :** तमिळनाडूमध्ये जवळपास एका वर्षाने १ सप्टेंबरपासून शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये पुन्हा उघडण्यात आली आहेत. त्यानंतर पहिल्या आठवड्यात २० विद्यार्थी आणि १० शिक्षकांना कोरोनाची लागण झाली आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या नागपूर जिल्ह्यातील हिंगणा येथील दत्त मेघा वैद्यकीय महाविद्यालयातील ११ विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहेत. विशेष म्हणजे या सर्व ११ जणांनी लसीचे दोन्ही डोस घेतलेत.

## गणपती बाप्पा मोरया..!

### १८०० गणेशभक्तांना घेऊन मोदी एक्स्प्रेस रवाना

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाकरिता कोकणात जाणाऱ्या १८०० चाकरमान्यांना घेऊन मोदी एक्स्प्रेस मंगळवारी (दि. ७) मुंबईहून सावंतवाडीकडे रवाना झाली. रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, भाजप आमदार नितेश राणे यांनी दादर स्थानकावर या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. या ट्रेनमधील प्रवाशांनी गणपतीची आरती म्हणत प्रवासाला सुरुवात केल्याचे व्हिडीओ सोशल नेटवर्किंगवर व्हायरल होत आहेत. काही दिवसांपूर्वीच नितेश राणेंनी या ट्रेनसंदर्भात घोषणा केली होती.



पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पनेतून २२५ ट्रेन आम्ही कोकणवासीयांसाठी सोडल्या आहेत. महाराष्ट्रात गणेशोत्सव अत्यंत आनंदाने साजरा केला जातो. आता ही रेल्वे कोकणात जाणार आहे. या रेल्वेमुळे कोकणवासी खूश आहेत, असे या वेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना रावसाहेब दानवे म्हणाले.

आमदार नितेश राणे यांनी, दरवर्षी मी गणपतीच्या वेळी प्रवाशांसाठी बसेस सोडतो, पण या वर्षी आम्ही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानणार आहोत. नारायण राणेंना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान देऊन पंतप्रधान मोदींनी कोकणाला आशीर्वाद दिला आहे. त्यामुळे त्यांचे आभार मानण्यासाठी गणेश चतुर्थीसाठी मोदी एक्स्प्रेस सोडत आहोत, अशी माहिती दिली होती. मुंबई ते सावंतवाडी या प्रवासात मोदी एक्स्प्रेसमध्ये सर्व प्रवाशांना एक वेळचे जेवणदेखील दिले जाणार आहे.

## पंतप्रधानांच्या हस्ते पाच शैक्षणिक योजनांचा शुभारंभ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिक्षक पर्व परिषदेच्या उद्घाटन समारंभास संबोधित करताना शिक्षण क्षेत्राशी संबंधित पाच महत्त्वाच्या योजनांचा शुभारंभ केला. यामध्ये भारतीय सांकेतिक भाषा शब्दकोष, बोलणारी पुस्तके, सीबीएसईच्या शालेय गुणपत्ता हमी आणि मूल्यांकन आराखडा, निष्ठा-निपुण भारत आणि विद्यांजली पोर्टल यांचा समावेश आहे.

डिजिटल मोडद्वारे विद्यार्थी आणि शिक्षकांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, शिक्षक पर्वाच्या निमित्ताने सुरू करण्यात आलेल्या या नवीन योजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. देश सध्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहे. स्वातंत्र्याच्या १०० वर्षांनंतर भारत कसा असेल यासाठी देश नवीन संकल्प घेत आहे.




पनवेल भाजपतर्फे
**जनहितार्थ**
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**बुधवार, दि. ८ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. आरोग्य उपकेंद्र ६, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. उपकेंद्र लॉ कॉलेज, तळोजा
१२. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
१३. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१४. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१५. श्री. गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
१६. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१७. आगरी शाळा, खांदा कॉलनी
१८. सेंट्रल रेल्वे, पनवेल

**कोवॅक्सिन**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

**टीप : प्रत्यक्ष लसीकरणासाठीची कुपन्स मर्यादित असल्यामुळे ऑनलाइन नोंदणीस प्राधान्य द्यावे.**

**पनवेल महानगरपालिकेने परदेशात शिक्षणाकरिता, नोकरीकरिता तसेच ऑलिम्पिक खेळाकरिता जाणाऱ्या नागरिकांसाठी कोविड लसीकरण कोविशिल्डचा दुसरा डोस देण्याकरिता विशेष सत्राचे आयोजन केले आहे. या सत्रामध्ये पहिला डोस घेऊन २८ दिवस पूर्ण झालेल्या परदेशी जाणाऱ्या नागरिकांचे लसीकरण केले जाईल.**

**कागदपत्रे :- आधार कार्ड, पासपोर्ट, व्हिसा डॉक्युमेंट, परदेशात काम करीत असल्याचे प्रमाणपत्र तसेच खेळाकरिता किंवा शिक्षणाकरिता संबंधित संस्थेचे ऑफर लेटर**


## मंगळागौर स्पर्धा रंगली; महिलांना नियुक्तीपत्र प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भारतीय जनता पक्ष खांदा कॉलनी महिला मोर्चाच्या वतीने मंगळागौर स्पर्धेचे आयोजन मंगळवारी (दि. ७) करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन भाजप महिला मोर्चाच्या पनवेल तालुका अध्यक्ष तथा पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत यांच्या हस्ते झाले. या वेळी खांदा कॉलनी विभागातील विविध पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या महिलांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

भाजप महिला मोर्चा खांदा कॉलनी शहर अध्यक्ष राखी पिंपळे व सहकारी महिलांनी ही मंगळागौर स्पर्धा आयोजित केली होती. चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात झालेल्या या स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धात्मक कार्यक्रमास पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर तथा नगरसेविका चारुशीला घरत, नगरसेविका सीता पाटील, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, तालुका सरचिटणीस प्रतिभा भोईर, माजी नगरसेविका नीता माळी, तालुका उपाध्यक्ष समीना साठी, सुहासिनी केकाणे, प्रिया मुकादम, योगिता भगत, आशा मुंडे, मल्लिका शेट्टी, संध्या जाधव, शैला मोरे, सीमा निकम, मनीषा गोळे, वरिजा गुजरान, क्रांती शेट्टी, विनोदा शेट्टी, सोनाली सावंत, सुनिता चव्हाण, मनीषा पाटील, अरुणा खरात यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्या आणि स्पर्धक महिला उपस्थित होत्या.

या वेळी खांदा कॉलनी विभागीय महिला मोर्चाच्या उपाध्यक्षपदी मनीषा पाटील, सचिवपदी क्रांती शेट्टी, सदस्य म्हणून विनोदा शेट्टी, वरिजा गुजरान, मनीषा गोळे, सीमा निकम यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

# पनवेल महापालिकेने ओलांडला पाच लाख लसीकरणाचा टप्पा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेने पाच लाख कोविड लसीकरणाचा टप्पा ओलांडला असून आतापर्यंत शासकीय लसीकरण केंद्र आणि खाजगी लसीकरण केंद्रावर एकूण पाच लाख एक हजार ४१६ लसींचे डोस नागरिकांना देण्यात आले आहे. लसींच्या उपलब्धतेनुसार लसीकरण केंद्र वाढविण्यात येत आहेत. संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त नागरिकांनी लस टोचून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

शासनाच्या निर्देशानुसार पहिल्या टप्प्यात आरोग्य कर्मचारी, दुसऱ्या टप्प्यात पहिल्या फळीवर काम करणारे कर्मचारी, तिसऱ्या टप्प्यात ६० वर्षावरील, तसेच ४५ वर्षावरील नागरिकांचे लसीकरण केले जात आहे. १ मेपासून १८-४४ वयोगटातील नागरिकांसाठी लसीकरणास सुरू करण्यात आली होती. त्यानुसार पनवेल महापालिका क्षेत्रात मंगळवार (दि. ७)अखेर एकूण पाच लाख लसीकरण पूर्ण झाले आहे. सध्या महापालिका क्षेत्रात २८ शासकीय आणि ७७ खाजगी लसीकरण केंद्रांना परवानगी देण्यात आली आहे. प्रत्येक शासकीय केंद्रावर रोज लसींच्या उपलब्धतेनुसार १०० ते २०० कुपन्सचे वाटप केले जात आहे. यासाठी आजवर २२४६ सत्रे आयोजित करण्यात आली असून रोज सरासरी ३९०० डोस नागरिकांना दिले जातात.



सद्यस्थितीत लसपुरवठा मुबलक प्रमाणात होत असल्याने दररोज पाच हजारांहून अधिक लसींचे डोस नागरिकांना दिले जात आहे.

पनवेल महापालिकेने शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागांवर लक्ष केंद्रीत केले आहे. सध्या ग्रामीण भागात ६७ ठिकाणी लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे. वैद्यकीय आरोग्य विभागाचे मुख्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या १० लसीकरण टीम कार्यरत आहेत. आठवड्यातील विशिष्ट दिवशी या ठिकाणी लसीकरण केले जात आहे.

समाजातील प्रत्येक घटकांना लसीकरणात सामावून घेण्याच्या दृष्टीने बेघर, बेवारस, वृद्धाश्रम, अंथरुणाला खिळलेले पुनर्वसन केंद्रातील मनोरुग्ण, स्मृतिभ्रंश, अर्धांगवायू रुग्ण, तसेच नुकतेच फणसवाडी, चाफेवाडी या आदिवासी पाड्यांवरील नागरिकांचेही लसीकरण करण्यात आले. वारांगना व एचआयव्ही पॉझिटिव्ह नागरिकांसाठी सोमवारी (दि. ६) खास लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी लसींचे ३०० डोस देण्यात आले.

कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर लसीकरण महत्त्वाचे असल्याने पनवेल कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त नागरिकांनी लसीकरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

# भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा एक लाख कार्यकर्त्यांशी संवाद

## पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम राबविण्याच्या सूचना

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी तंत्रज्ञानाचा वापर करून मंगळवारी (दि. ७) पक्षाच्या बूथपासून प्रदेश स्तरापर्यंतच्या एक लाख पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

बूथरचना आणि पन्नाप्रमुख योजनेच्या जोरावर भाजप निवडणुकांत प्रचंड यश मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १७ सप्टेंबर या वाढदिवसानिमित्त प्रत्येक बूथमध्ये केंद्र सरकारच्या योजनांच्या २१ लाभार्थींचा सत्कार करावा, अशी सूचनाही त्यांनी कार्यकर्त्यांना केल्या.

भाजपतर्फे बूथपातळीपासून पक्ष संघटना बळकट करण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात आली. पक्षाचे ८७,००० बूथप्रमुख, १६,००० शक्ती केंद्रप्रमुख, जिल्हाध्यक्ष आणि प्रदेश पदाधिकारी अशा सर्व पातळ्यांवरील एक लाख कार्यकर्त्यांना चंद्रकांत पाटील यांनी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संबोधित केले. या वेळी बूथरचना उपक्रमाचे संयोजक माजी आमदार डॉ. रामदास आंबटकर आणि सहसंयोजक अरविंद निलंगेकर उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, बूथ समितीच्या माध्यमातून पंतप्रधान मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर ते दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती २५ सप्टेंबर या कालावधीत 'सेवा आणि समर्पण सप्ताह' साजरा करण्यात येईल. प्रत्येक बूथमधील केंद्र सरकारच्या लाभार्थींची यादी करून त्यांच्यापैकी २१ जणांचा सत्कार भाजपतर्फे करण्यात येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी २००१ साली सर्वप्रथम गुजरातचे मुख्यमंत्री झाले व यंदा त्यांच्या मुख्यमंत्री व पंतप्रधान या कारकिर्दीची २० वर्षे पूर्ण होत असून २१व्या वर्षांत प्रवेश होत आहे, हे महत्त्वाचे आहे. याखेरीज पक्षातर्फे सेवा आणि समर्पण सप्ताहात विविध उपक्रम राबविण्यात येतील.

# आधी चोऱ्या, आता बहाणे!

## प्रवीण दरेकरांचे नवाब मलिकांना प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएस अधिकाऱ्यांसोबत बैठकी झाल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांना टार्गेट केले जातेय, हा नवाब मलिकांचा आरोप म्हणजे 'आधी चोऱ्या आता बहाणे' असा प्रकार आहे, अशा शब्दांत विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी उत्तर दिले आहे.



स्वतःला अपयश आले की केंद्रावर आरोप, कोरोना वाढला की सामान्य जनतेवर आरोप, खरे तर आरोप करण्याशिवाय या सरकारचे मंत्री काहीच करीत नाहीत. रोज सकाळी मीडियाला अजेंडा ठरवून देऊन सरकार चालत नसते, त्यासाठी परिश्रम करावे लागतात. आरोप झाले की कुठल्याही चौकशीला सामोरे जायला तयार, अशी विधाने करायची आणि नोटीस आली की बिळात लपून बसायचे. तुम्ही जर काही केले नसेल, तर चौकशीला का घाबरता? का तुमचे सहकारी दोन-तीन महिन्यांपासून फरारी आहेत? त्यामुळे हा संपूर्ण प्रकार म्हणजे 'आधी चोऱ्या नंतर बहाणे' अशाच वर्गवारीत मोडणारा आहे, असेही प्रवीण दरेकर यांनी म्हटले आहे.

असेच प्रकार बेळगावमधील भाजपच्या विजयानंतर काही नेते करीत आहेत. मराठी माणसाचा पराभव वगैरे बिरूद ते लावतील. पण, भाजपच्या विजयी ३६ नगरसेवकांपैकी २३ मराठी आहेत, हे तुम्हाला कधीही सांगणार नाहीत. निव्वळ भावनात्मक विषय करून सामान्य जनतेची फसवणूक तुम्ही करू शकत नाही. निवडणूक निकालावर शंका उपस्थित करून शिवसेना आता काँग्रेसच्या अधिक जवळ गेली आहे. ईव्हीएमवर शंका उपस्थित करणारी पूर्वी एकमेव गलितगात्र काँग्रेस होती. शिवसेनेलाही त्याच रांगेत जाऊन बसण्यासाठी आमच्या शुभेच्छा आहेत, असेही दरेकर यांनी म्हटले आहे.

# काळुंद्रे येथे कोरोना लसीकरण केंद्र सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या वतीने कोरोनाचा वाढता प्रादूर्भाव लक्षात घेता ग्रामीण भागात आठवडाभर 'कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम' राबविण्यात येत आहे. त्यानुसार महापालिका हद्दीतील काळुंद्रे येथे सोमवारी (दि. ६) मोफत कोविड १९ लसीकरण केंद्र सुरू झाले आहे. या लसीकरण केंद्रासाठी आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, तसेच प्रभाग क्रमांक २० मधील नगरसेवकांनी विशेष प्रयत्न केले होते.



हे लसीकरण केंद्र काळुंद्रे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत सुरू झाले आहे. या केंद्रावर दर सोमवारी कोरोनाच्या कोविशिल्ड आणि कोवॅक्सिन लसीचा पहिला आणि दुसरा डोस देण्यात येणार आहे. या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत, नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, काळुंद्रे गाव शक्ती केंद्र प्रमुख बाळाराम चिखलेकर, ज्येष्ठ कार्यकर्ते शंकर म्हात्रे, ज्येष्ठ कार्यकर्ते वसंत घरत, अनंता पाटील, काळुंद्रे-भिंगारी प्रकल्पग्रस्त संघटना अध्यक्ष गणेश घरत, माजी ग्रामपंचायत सदस्य डी. एस. घरत, शक्ती केंद्र प्रमुख नरेश घरत, बूथ अध्यक्ष विशाल म्हस्कर, सचिन चिखलेकर आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

करुणा शर्मा प्रकरण

# परळी सुन्न आहे; पंकजा मुडेंचे सूचक ट्विट

**बीड : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील परळीमध्ये घडलेल्या करुणा शर्मा यांच्या प्रकरणानंतर भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी सूचक ट्विट करत टीका केल्याचे समोर आले आहे. परळी सुन्न आहे, मान खाली गेली आहे राज्याची, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.



दरम्यान, बीडमधील अंबाजोगाई सत्र न्यायालयाने जातीवाचक शिवीगाळ आणि गाडीत पिस्तूल आढळल्याप्रकरणी करुणा शर्मा यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावलेली आहे. याचबरोबर त्यांच्या वाहनचालकास एक दिवसाची पोलीस कोठडीदेखील सुनावली गेली आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडेंचे ट्विट समोर आल्याचे दिसत आहे.

अन्याय चुकीच्या लोकांच्यात ताकत असल्यामुळे होतो असे नाही, पराक्रमी हात बांधून बसतात म्हणून होतो. शासन, प्रशासन, न्यायव्यवस्था कोणी आपल्या दारात नाही बांधू शकत, हा विश्वास हरवू नये. राँग प्रेसिडेंट शुड नॉट बी सेट! ही काळाची गरज आहे. परळी सुन्न आहे मान खाली गेली आहे राज्याची, असे पंकजा मुंडे यांनी ट्विटद्वारे म्हटले आहे.

# पनवेल रेल्वेस्थानकापर्यंतच्या प्रवासी बसफेऱ्यांत वाढ करण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवानिमित्त गणेश दर्शन व आप्तमंडळीच्या भेटीगाठीसाठी साईनगर व करंजाडे सेक्टर ६ ते पनवेल रेल्वेस्थानकापर्यंतची एनएमएमटी शहर व परिवहन प्रवासी बस सेवा नियमितपणे व प्रवासी फेऱ्यांत वाढ करावी, अशी मागणी पनवेल प्रवासी संघाच्या वतीने प्रशासनाला निवेदन देऊन करण्यात आली आहे.

या संदर्भात चर्चाही झाली होती. त्याप्रमाणे एनएमएमटी प्रशासनाकडून लवकरात लवकर गणेशोत्सवापूर्वी प्रवासी बससेवा चालू करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

प्रवासी संघातर्फे सर्व प्रवासी भक्तगण बांधवांना आवाहन करण्यात येत आहे की, प्रवासी बांधवांनी जास्तीत जास्त बसनेच प्रवास करून या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ. भक्तिकुमार दवे यांनी केले आहे.

# डेमू रेल पॅसेंजर सेवा लवकरच होणार सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-दिवा-वसई-डहाणू, दिवा-पनवेल-पेण-रोहा व पनवेल-कर्जत-पुणे या विभागांवर रेल्वेची (डीएमयू) डेमू रेल पॅसेंजर सेवा लवकरच सुरू होणार आहे, अशी माहिती पनवेल प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ. भक्तिकुमार दवे यांनी दिली.

गणेशोत्सवानिमित्त औद्योगिक कामगारांना या विभागामधून वेळेवर कामावर जाण्या-येण्यासाठी सार्वजनिक बस वाहतुकीची व्यवस्थित सोय नसल्यामुळे पनवेल प्रवासी संघ, पनवेल रेल्वेस्थानक स्थानिय सल्लागार समिती, एसआरयूसीसी, झेडआरयूसीसी, एनआरयूसीसी सदस्य या सर्वांच्या वतीने शासनाला निवेदन देण्यात आले, तसेच चर्चाही करण्यात आली. त्यानुसार गणेशोत्सवापूर्वीच डीएमयू रेल पॅसेंजर सेवा सुरू होऊन गणेशभक्तांना व औद्योगिक कामगारांना दिलासा मिळणार आहे.

# जेएनपीटीमध्ये कंटेनर वाहतूक हाताळणीत वाढ

**उरण : वार्ताहर**

जेएनपीटी हे कंटेनर हाताळणी करणारे देशातील आघाडीचे बंदर आहे. ऑगस्ट महिन्यात जेएनपीटीमध्ये कार्गो हाताळणीत उल्लेखनीय वाढ झाली असून या महिन्यात एकूण ४५३,१०५ टीईयूची हाताळणी नोंदवली गेली, जी ऑगस्ट २०२०मधील ५२,७३५ टीईयूच्या तुलनेत २८.४५ टक्के अधिक आहे. जेएनपीटीमधील एनएसआईजीटीने ऑगस्ट २०२१मध्ये ९८,४७३ टीईयूची हाताळणी केली, जी एनएसआईजीटीच्या स्थापनेनंतरची आजवरची सर्वाधिक आहे.

**आम्ही आमच्या सर्व भागधारकांसह एकत्र काम करून, आमच्या कामगिरीचा चढता आलेख कायम ठेवण्यासाठी आशावादी आहोत. देशातील व्यापारास प्रोत्साहन देण्याच्या हेतूने, आम्ही सदैव आंतरराष्ट्रीय मानकांचे पालन करीत आमची प्रचालन कार्यक्षमता आणि बंदराच्या क्षमतेमध्ये सतत वाढ करण्याचा प्रयत्न करीत आहोत.**

**-संजय सेठी, अध्यक्ष, जेएनपीटी**



**पनवेल : गणरायाचे आगमन येत्या दोन दिवसांत होणार आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकार वसीम पटेल यांनी कहकशा हा गणेशोत्सव विशेषांक प्रकाशित केला आहे. या विशेषंकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. या वेळी पत्रकार संजय कदम, विशाल सावंत, अनिल कुरघोडे आदी उपस्थित होते.**

# जासई हायस्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला.




या कार्यक्रमास विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे, भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय सरचिटणीस व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील, मधुकर पाटील, प्राचार्य व 'रयत'चे लाइफवर्कर अरुण घाग, उपमुख्याध्यापक पी. पी. मोरे, पर्यवेक्षक आर. एस. साळुंखे, रयत सेवक संघाचे उपाध्यक्ष नुरा शेख उपस्थित होते.


या वेळी विद्यालयातील सेवकांचा गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. उरण तालुका मुख्याध्यापक संघाच्या खजिनदारपदी नियुक्ती झाल्याबद्दल प्राचार्य अरुण घाग यांचा सत्कार झाला. जी. आर. म्हात्रे, एस. एस. शिंदे व प्राचार्य यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याची माहिती सांगितली. सुरेश पाटील व जगे यांनी शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन मयूरा यांनी केले, तर आभार मोरे यांनी मानले.

पान १ वरून

# माथेरान गिरीक्षेत्र येथे साहसी खेळासाठी परवानगी द्यावी

समुद्रसपाटीपासून सुमारे ८०० मीटर हा उच्च उंचीचा परिसर सरकारने इको सेन्सिटिव्ह झोन म्हणून घोषित केला आहे. इको सेन्सिटिव्ह झोन म्हणून घोषित हा परिसर उद्योग आणि वाहनमुक्त आहे. तेथील टॉय ट्रेन आणि पर्यावरणपूरक वातावरण हे जगभरातील पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. इको सेन्सिटिव्ह झोन असल्याने पर्यटन हा येथील मुख्य व्यवसाय आहे. दरवर्षी जगभरातील सुमारे १० लाख पर्यटक माथेरान गिरीक्षेत्रात पर्यटनाचा आनंद घेतात. अधिकाधिक पर्यटकांना या क्षेत्राकडे आकर्षित करून पर्यटनवाढीसाठी साहसी खेळ असणे आवश्यक आहे.

साहसी खेळांना आज जगभरात मान्यता मिळाली आहे आणि पर्यटकांमध्ये साहसी खेळांचे विशेष आकर्षण आहे. यामुळे माथेरान गिरीक्षेत्र येथे पर्यटकांची संख्या वाढण्याबरोबरच स्थानिक लोकांचा रोजगारही वाढेल. त्यामुळे माथेरान गिरीस्थानमध्ये पर्यटन, विकास आणि स्थानिक रोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी या ठिकाणी साहसी खेळास परवानगी देण्यात यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय पर्यटनमंत्री जी. किशन रेड्डी यांच्याकडे केली.

पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

## पनवेल महापालिका ग्रामीण हद्दीत होणारे कोरोना प्रतिबंधक लसीकरण

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **बुधवार** | वळवली रा.जि.प. शाळा Ward B | रोहिंजण रा.जि.प. शाळा Ward A | मुर्बी रा.जि.प. शाळा Ward A | कोयनावेळे रा.जि.प. शाळा | पालेखुर्द रा.जि.प. शाळा | पेंधर रा.जि.प. शाळा | तळोजे मजकूर रा.जि.प. शाळा | कळंबोळी काळभैरव मंदिर सभागृह | आसुडगाव रा.जि.प. शाळा | जुई गाव रा.जि.प. शाळा |
| **गुरुवार** | सिद्धी करवले रा.जि.प. शाळा Ward A | तोंडरे खालचा पाडा रा.जि.प. शाळा | धानसर रा.जि.प. शाळा | घोट रा.जि.प. शाळा/म्हात्रे पाडा/ गोंधळी पाडा/मढवी पाडा/ वाघ्राची वाडी रा.जि.प. शाळा | बेलपाडा मंदिर | पेठ रा.जि.प. शाळा | ओवे रा.जि.प. शाळा | ढोंगऱ्याचा पाडा रा.जि.प. शाळा Ward A | पालेखुर्द पाटीलवाडी रा.जि.प. शाळा | कामोठे रा.जि.प. शाळा Ward |

**निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता १५० व दुसऱ्या डोसकरिता ५० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी. (वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत)**


## तहसिलदार उरण यांचे न्यायालयात

कलम १५५ दावा क्र.०३/२०२१

प्रति,

१. श्री. अविनाश गजानन पाटील, रा. चिर्ले, गावठाण, ता.उरण, जि. रायगड } --- अर्जदार

विरुध्द

२. श्री. अंबाजी हाल्या, रा. जांभूळपाडा, ता. उरण, जि. रायगड } --- सामनेवाला

**विषय :- महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६चे कलम १५५ प्रमाणे दावा. सुनावणी करिता हजर रहाणेबाबत.**

अर्जदार तसेच सामनेवाले यांस कळविणेत येते की, मौजे - जांभूळपाडा, ता. उरण येथील स. नं. ३० हि. नं. ७ या ७/१२ वरील इतर हक्कातील नाव कमी करणेबाबत अर्जदार यांनी या कार्यालयाकडे केलेल्या अर्जाबाबत सदर दाव्याची **सुनावणी दि. २४/०९/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता तहसिल कार्यालय, उरण** येथे ठेवणेत आलेली आहे.

सदर सुनावणीस आपण स्वता अथवा आपले वकिलांमार्फत **सर्व साक्षी पुरावे व कागदपत्रांसह** या कार्यालयात सदर दिवशी व वेळी हजर रहावे. सदर सुनावणीस आपण हजर न राहिल्यास सदर प्रकरणांची सुनावणी आपले गैरहजेरीत घेणेत येवून सदर प्रकरणी आपणांस काहीही सांगायचे नाही, असे गृहित धरून उपलब्ध कागदपत्रांवरून निर्णय दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक:- ०७/०९/२०२१

ठिकाण :- उरण

**सही/-**
**तहसिलदार उरण**

## संपादकीय

# निर्बंधांचा बागुलबुवा

गणेशोत्सव तोंडावर आलेला असताना अपेक्षेप्रमाणेच सत्ताधारी पक्षाचे नेते पुन्हा एकदा निर्बंध लादण्याची भाषा करू लागले आहेत. याची अटकळ बहुतेकांना होतीच. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचे भय दाखवून लोकांच्या वावरण्यावर निर्बंध लादण्याचे महाविकास आघाडी सरकारचे धोरण काही नवीन नाही. अशा प्रकारच्या भयाच्या राजकारणाचा पुरेपूर अनुभव महाराष्ट्राची जनता घेतच आली आहे.

**कोरोनाचे संकट अजून टळलेले नाही. लोकांनी पुरेशी काळजी घ्यायलाच हवी. याबाबत दुमत असण्याचे कारण नाही, परंतु नेमक्या सणासुदीच्या दिवसांतच सरकारला निर्बंधांची आठवण का होते हा खरा प्रश्न आहे. गोकुळाष्टमीच्या सुमारास अशाच प्रकारचे वातावरण तयार करण्यात आले. कोरोनाचा बागुलबुवा पुढे करून गोविंदा पथकांचा हिरमोड करण्याचे कार्य महाविकास आघाडी सरकारने तडीला नेले. तेव्हाच गणेशोत्सवावर देखील निर्बंधांची कुऱ्हाड कोसळणार याचा अंदाज आला होता. सणावाराच्या निमित्ताने लोकांच्या एकत्र येण्याला राज्य सरकार कडाडून विरोध करते. त्याच वेळेस मॉल्स, दुकाने, बाजारपेठा आणि उपनगरी रेल्वेगाड्यांमधील गर्दीकडे काणाडोळा करते. निर्णयांमधली ही विसंगती कशामुळे, असा प्रश्न निर्माण होतो. हो-ना करता करता उपनगरी रेल्वेगाड्या सुरू करताना राज्य सरकारने बरीच खळखळ केली होती, परंतु मुंबईकरांच्या रेट्यामुळे लोकल गाड्या अटीशर्तींसह सुरू करण्यात आल्या. दैनिक तिकीट तूर्त कुणालाही मिळणार नाही. लसींचे दोन्ही डोस पूर्ण झाल्याचा दाखला दाखवल्यास रेल्वेचा मासिक पास मिळू शकेल अशी अट सरकारने घातली. तरी देखील उपनगरी रेल्वेगाड्यांमध्ये किती गर्दी असते हे सरकारात बसलेल्या मंत्र्यांनी स्वत: डोळ्यांखालून घालावे. सर्व प्रकारची गर्दी चालते, परंतु सण मात्र साजरे करू नका या सरकारच्या आग्रहाला राजकारणाचा दुर्गंध येतो. गणेशोत्सवाच्या निमित्ताने कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी मोदी एक्स्प्रेस चालवण्याची घोषणा केली. या विशेष रेल्वेगाडीचा हजारो चाकरमान्यांना लाभ होणार आहे. मोदी एक्स्प्रेसचा शुभारंभ दादर रेल्वेस्थानकावर मंगळवारी थाटामाटात झाला. या वेळी रेल्वे राज्यमंत्री दानवे यांनी मुंबईकर प्रवाशांशी गप्पागोष्टी करत रेल्वेतून प्रवासदेखील केला आणि त्यांची मने जाणून घेतली. अशा प्रकारचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारचा एक तरी मंत्री करताना दिसतो का? लोकांसाठी सत्ता राबवताना सत्ताधाऱ्यांनी लोकांशी मिळून-मिसळून राहिले पाहिजे, परंतु आघाडी सरकारातील मंत्र्यांचे हेतूच वेगळे आहेत. मोदी एक्स्प्रेस सुरू होणार आणि त्यायोगे केंद्रातील मोदी सरकारला दुवा मिळणार या विचाराने कासावीस झालेल्या महाविकास आघाडी सरकारने अखेरच्या क्षणी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी टोलमाफी जाहीर केली. बुंद से गयी वो हौद से नहीं आती हा धडा राज्य सरकारात बसलेले नेते कधी घेणार कोण जाणे? राजकीय सभा आणि सरकारी उद्घाटन समारंभ यांना होणारी गर्दी सत्ताधाऱ्यांना चालते. सत्ताधारी पक्षाचाच कार्यक्रम असेल, तर तोदेखील विनासायास पार पडतो. कोणावरही साधा नियमभंगाचा गुन्हादेखील नोंदला जात नाही, परंतु असाच कार्यक्रम भारतीय जनता पक्षाने आयोजित केला, तर महाविकास आघाडी सरकारच्या नेत्यांच्या तळपायाची आग जणू मस्तकाला जाते. भाजपला मिळणारा जनतेचा उदंड प्रतिसाद पाहूनच गणेशोत्सवावर निर्बंधांचे जाळे फेकण्याचा हा प्रकार आहे. याच कारणासाठी महाराष्ट्रातील देवळेदेखील बंद आहेत हे जनतेने लक्षात घ्यावे.**

# कोकण रेल्वेने रायगडकरांना दिलासा द्यावा




कोकणची माणसे साधी भोळी, त्यांच्या काळजात भरली शहाळी म्हणतात, ते खरेच आहे. म्हणूनच त्याचा फायदा कोकण रेल्वे प्रशासनाने घेऊन त्यांच्यावर सतत अन्याय केला आहे. कोकण रेल्वेच्या माध्यमातून रेल्वेला चांगले उत्पन्न मिळत असतानाही प्रकल्पग्रस्त रायगड जिल्ह्याला रेल्वेने सापत्नभावाची वागणूक दिली आहे. गणेशोत्सव तोंडावर आला तरी दिवा-रोहा गाडीही सुरू करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. यावरून रायगड जिल्ह्यातील गणेशभक्तांच्यात नाराजी पसरली आहे.

कोकण रेल्वे रायगड जिल्ह्यातून जाते. या रेल्वे प्रकल्पासाठी रायगडमधील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या, पण या रेल्वेचा फायदा मात्र रायगडवासीयांना फारसा झालाच नाही. दक्षिणेतील केरळ, तमिळनाडू आणि गोवा या राज्यांनाच याचा जास्त फायदा झाला. त्यांचा वेळ आणि पैसा वाचला. त्यांच्या राज्यात दर २० मिनिटाने थांबणारी कोकण रेल्वे रायगडमध्ये मात्र थांबत नाही. ज्या गाड्यांना रोहा किंवा माणगाव येथे थांबा दिला आहे, त्या गाड्यांनी पहाटे मुंबईला येऊन काम आटोपून पुन्हा रात्री परत जाणे शक्य होत नाही. रोहा-दिवा गाडी सुरू असल्याने रोहा व पेण तालुक्यातील चाकरमानी या गाडीने रोज मुंबईला जाऊन येत होता.




कोरोना सुरू झाल्यावर रोहा गाडी बंद केली. आज कोकणात जाणाऱ्या गाड्या सुरू झाल्या, मुंबईत लोकल सुरू झाली, पण रोहा गाडी फक्त रेल्वे कर्मचाऱ्यांसाठीच सुरू आहे. त्यामुळे रायगडवासीयांना लालपरीचा आणि खाजगी गाड्यांचाच आधार घ्यावा लागतो.

## खबरबात
**नितीन देशमुख**

कोकण रेल्वे प्रकल्पासाठी जागा दिली. त्या वेळी रायगडमधील शेतकऱ्याने स्वप्न पाहिले होते की, आपण आपला शेतमाल घेऊन सकाळी मुंबईला जाऊन रात्री परत घरी येऊ, पण ते स्वप्नच ठरले. त्यामुळे खड्डेमय मार्गावरून आदळत-आपटत आपल्या शरीराच्या अनेक भागाला दुखापतग्रस्त करून किंवा कायमचे अधू करून डॉक्टरची बिले मात्र तो देत आहे. त्याच वेळी कोकण रेल्वे धडधडत समोरून जाते आणि त्यातून दक्षिणेकडील माणूस आरामात प्रवास करीत असल्याचे पाहणे त्याच्या नशिबी आले आहे. कोकण रेल्वेच्या मार्गावरून जाणाऱ्या गाड्या तोट्यात नाहीत. कोलाड स्टेशनवरून जाणाऱ्या रो-रो सर्व्हिसमुळे कोकण रेल्वेला कोट्यवधी रुपयांचा फायदा होतो.

या मार्गाचे वीर-दासगावपर्यंतचे दुहेरीकरण आणि विद्युतीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. आता या मार्गावरून रायगड जिल्ह्यातील लोकांना सोयिस्कर ठरलेत अशा गाड्या सुरू करणे आवश्यक आहे. या गाड्या वीर किंवा माणगावहून सोडणे आवश्यक आहे. त्यामुळे रायगडबरोबरच रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली आणि मंडणगड या तालुक्यातील लोकांनाही त्याचा फायदा होईल. ईमू गाडी सध्या १२ डब्यांची असून ती दिवा-रोहा आणि पेण-दिवा चालवली जाते. ती गाडी १५ डब्यांची करून दासगाव किंवा माणगावहून सोडून तिच्या फेऱ्या वाढवणे गरजेचे आहे. पनवेल-कर्जत मार्गावरील प्रवाशांची गर्दी पाहता या मार्गावरही अशीच गाडी सुरू करण्याची मागणी जोर धरत आहे. अलिबागसाठीही आरसीएफ मार्गावरून रेल्वेची शटल सेवा सुरू करण्याची अनेक दिवसांची मागणी आहे. याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे.




रायगड जिल्ह्यातील अनेक जण मुंबई, ठाणे येथे नोकरी धंद्यानिमित्त जात असतात. काही स्थायिकही झाले आहेत. ते गणेशोत्सवासाठी नेहमी आपल्या गावाला जातात. कोकण रेल्वेने गणेशोत्सवासाठी १७५ जादा गाड्या सोडल्या आहेत. त्या पूर्ण आरक्षित आहेत. त्यांचा उपयोग रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात जाणाऱ्यांनाच जास्त होतो. रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, रोहा, पेण तालुक्यांतील नागरिकांना या गाड्यांचा फायदा मिळत नाही. दिवा-रोहा गाडी सुरू असती, तर रोह्यापर्यंत या गाडीने जाऊन पुढे आपल्या गावी जाता येत होते, पण कोरोनाच्या काळात बंद केलेल्या या गाड्या मध्य रेल्वेने अद्याप सुरू केलेल्या नाहीत. त्यामुळे लालपरी किवा खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांशिवाय त्यांना पर्यायच नाही. त्याच वेळी तळकोकणात जाणारा भक्त आरामात कमी खर्चात आणि लवकर आपल्या गावी पोहचतो. त्याच्यापेक्षा अंतर कमी असूनही जास्त पैसे देऊन आणि वेळही जास्त देऊन रायगडवासीयांना आपल्या गावाला जावे लागत आहे. कोकण रेल्वे प्रशासनाने याचा गांभीर्याने विचार करून त्यांना दिलासा द्यावा हीच मागणी रायगडचा रेल्वे प्रकल्पग्रस्त गणेशोत्सवाच्या निमित्ताने करीत आहे.

# ‘अंनिस’च्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराला रोह्यात प्रतिसाद

(छाया : महादेव सरसंबे)




**रोहे : प्रतिनिधी**


निसर्गातील कुठल्याही घटनेला कार्यकारण भाव असतोच, तो शोधला पाहिजे. तसे न केल्यास बाबा, बुवा यांचे फावते व त्यांची संस्थाने उभी राहतात, असे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) चे रायगड जिल्हाध्यक्ष विवेक सुभेकर यांनी रविवारी (दि. ५) येथे केले.

अंनिसतर्फे रोह्यात रविवारी एक दिवसाचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. त्या वेळी उपस्थितांना विवेक सुभेकर मार्गदर्शन करीत होते. अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष मोहन भोईर यांनी या वेळी अनेक वैज्ञानिक चमत्कार करून दाखवले व त्यामागील कार्यकारण भाव उलगडून दाखवले.

रोहा शाखेचे कार्याध्यक्ष नंदकुमार राक्षे यांनी प्रास्ताविक केले. पेण शाखेचे कार्याध्यक्ष श्रीनिवास गडकरी यांनी सूत्रसंचालन केले. प्रश्नोत्तराचा कार्यक्रम चांगलाच रंगला. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रत्येकाला प्रशस्तीपत्र देण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी रोहा शाखेचे दीपक शिर्के, प्रमोद खांडेकर, कुमार देशपांडे, चंद्रशेखर सावंत यांनी विशेष मेहनत घेतली.

# गणेशोत्सवासाठी साहित्य खरेदीची पेण बाजारपेठेत लगबग

**पेण : प्रतिनिधी**



(छाया : अनिस मनियार)

गणेशाचे आगमन चार दिवसांवर आले असून गणेशोत्सव साजरा करण्यासाठी लागणाऱ्या साहित्य खरेदीसाठी भाविकांनी पेण बाजारपेठेत गर्दी केल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

रायगड जिल्ह्यातील प्रमुख शहरे आणि आठवडा बाजारपेठांमध्ये गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या डेकोरेशन साहित्य खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. प्लास्टिक आणि थर्माकोल बंदीमुळे पेणची बाजारपेठ इकोफ्रेंडली साहित्यांनी सजली आहे. गणरायाच्या स्थापनेसाठी वैविध्यपूर्ण मखर यंदा बाजारपेठेत विक्रीसाठी आली आहेत.

थर्माकोलची उणीव भासू नये म्हणून कलाकारांनी लाकूड, कागद आणि कापडापासून वैविध्यपूर्ण मखर बनवण्यास प्राधान्य दिले आहे. कागदी मखर, फुलांचे व कापडी मखर, तसेच लाकडाचे मखर, साईन बोर्ड यांचा यामध्ये समावेश आहे. मात्र या मखरांच्या किमतीत कमालीची वाढ झाली आहे. यात कागदी पुठ्ठ्यांच्या मखरांचे दर सुमारे ७०० पासून पाच हजार रुपयांपर्यंत आहेत. त्याचबरोबर लाकडी मखरांच्या किमती दोन हजार रुपयांपर्यंत आहेत.

सजावटीच्या अन्य वस्तूंनी बाजाराला शोभा आली आहे. यात फुलांच्या माळा, रंगीत कापड, झालर, मण्यांची तोरणे उपलब्ध आहेत. कृत्रिम फुलांचे दर १२०० रुपये तर कापडी फुलांचे दर १५०० पासून पाच हजार रुपयांपर्यंत आहेत. यंदा लाकडावर कोरीव काम करून पॉलीश केलेली मखर खास आकर्षण ठरत आहेत. हे मखर केवळ दोन आकारात उपलब्ध आहेत. त्यांच्या किमती तीन ते सहा हजार रुपयांपर्यंत आहेत. लाकडी मखराला अधिक पसंती मिळत आहे. काही मखर मागणीनुसार तयार करून ठेवली आहेत, अशी माहिती विक्रेत्यांनी दिली. आतून पुठ्ठा आणि सजावटीकरिता वेगवेगळ्या रंगांचे कार्डबोर्ड, कार्डपेपर वापरूनही काही मखर तयार करण्यात आले आहेत. त्यावर विविध प्रकारच्या लेस, मणी लावून सजावट करण्यात आली आहेत. हे मखर दोन ते आठ हजार रुपयांना विकली जात आहेत. कापडी सजावट करून तयार केलेले मखर दोन्ही पर्यायांपेक्षा महाग आहे. हे मखर किमान पाच हजार ते जास्तीत जास्त १५ हजार रुपयांना उपलब्ध आहेत.

(छाया : विनायक माडपे)



# डोंबिवली नागरी बँकेचा वर्धापन दिन उत्साहात

**खोपोली : प्रतिनिधी**

डोंबिवली नागरी सहकारी बँकेचा ५१वा वर्धापन दिन सोमवारी (दि. ६) खोपोली शाखेमध्ये अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

शाखाधिकारी प्रकाश खाडिलकर यांनी बँकेत येणाऱ्या ग्राहकांचे स्वागत केले. बँकेचे नवनिर्वाचित संचालक व खोपोली शाखेचे पालक योगेश वाळुंजकर यांनी ग्राहकांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला व कोरोना काळात बँकेने केलेल्या सेवाकार्यांची माहिती दिली. बँकेतील कर्मचारी स्वाती घांग्रेकर, प्रांजळ मिसाळ, विनया दातार, शंकर खोटरे, अशोक सालकर, प्रणव निकम यांच्यासह जनकल्याण समिती कार्यवाह नितिन भावे, ज्येष्ठ पत्रकार जयवंत माडपे आणि इतर मान्यवर या वेळी उपस्थित होते.

# खोपोलीतील शिबिरात २०० जणांचे लसीकरण

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील रोटरी क्लबने अल्टा लॅब व मिहीर हॉस्पिटल यांच्या सहकार्याने रविवारी (दि. ५) खोपोलीतील रोटरी सभागृहात पहिले लसीकरण शिबिर आयोजित केले होते. या वेळी दोनशे नागरिकांचे मोफत लसीकरण करण्यात आले.

अल्टा लॅब कंपनीच्या डीएसार फंडातून हा लसीकरण उपक्रम राबविण्यात आला. या शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष सुमन औसरमल यांनी केले. या वेळी खोपोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिरीष पवार, अल्टा लॅबचे व्यवस्थापक बाळासाहेब म्हात्रे, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुरेश खेडेकर, सचिव सुरेंद्र जोशी, माजी अध्यक्ष संजय पाटील, नगरसेविका वैशाली जाधव, प्रमिला सुर्वे आदी उपस्थित होते.

शिबिर यशस्वी करण्यासाठी मिहीर हॉस्पिटलचे डॉक्टर व कर्मचारी, रोटरी क्लबचे पदाधिकारी व सदस्य, अल्टा लॅबचे कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



# धाटावमध्ये आदर्श शिक्षकांचा सन्मान

**रोहे : प्रतिनिधी**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून बँक ऑफ महाराष्ट्रच्या धाटाव शाखेच्या वतीने रोहा तालुक्यातील आदर्श शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

रोहा तालुक्यातील आदर्श शिक्षिका विद्या बाळाराम रोहेकर, आदर्श शिक्षक नारायण गायकर, ब्रिजेश बाळकृष्ण भादेकर, विनायक विठ्ठल शिंदे यांचा बँक ऑफ महाराष्ट्रच्या धाटाव शाखा व्यवस्थापक आदित्यनाथ झा, तसेच अचला धारप, पांडुरंग बैकर यांच्या हस्ते सन्मान व सत्कार करण्यात आला. रेल्वे प्रोटेक्शन फोर्सचे जयप्रकाश यादव, अजिंक्य रोहेकर, भूपेंद्र घाटावकर, किशोर रोहेकर या वेळी उपस्थित होते.

# समीर येरुणकर यांना जि.प.चा आदर्श शिक्षक पुरस्कार

**कर्जत : बातमीदार**



तालुक्यातील जांभूळवाडी येथील प्राथमिक शाळेचे शिक्षक समीर तानाजी येरुणकर यांना रायगड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे.

रायगड जिल्हा परिषदेने शिक्षक दिनी (दि. ५) आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा केली. त्यात समीर येरुणकर (रा. वदप, ता. कर्जत) यांचा समावेश आहे. तालुक्यातील जांभुळवाडी येथील प्राथमिक शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचे काम येरुणकर करीत आहेत. तंत्रस्नेही शिक्षक, उत्तम चित्रकार, वक्ता असलेले येरुणकर गुरुजी कर्जत तालुका कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाह तर तालुका हॉलीबॉल असोसिएशनचे सहकार्यवाह म्हणून काम पाहत आहेत. जि. प. चा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याने येरुणकर यांचे अभिनंदन केले जात आहे.

# खालापुरात शेतकऱ्याच्या परवानगीशिवाय जमीन विक्री

## पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

मूळ जमीन मालकाला अंधारात ठेवून त्याच्या खोट्या सह्या करून जमीन स्वतःचे नावे करून विक्री केल्याची घटना खालापुरात घडली आहे.

फिर्यादी रामचंद्र महादू सुखदरे (वय ५०, रा. इसांबे, ता. खालापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार योगेंद्र नटवरलाल शहा (वय ६५, रा. चौक, ता. खालापूर) याने सर्वे नं. १०/३, मजकूर लिहून घेत सर्वे नं. १०/३, १०/५/अ, सहीत ४१/४/अ, ४१/१०, ४२/१/अ व ४२/२० या सर्व सर्वे नंबरच्या जमिनीची पनवेल प्रांत यांच्याकडून विक्री परवानगी प्राप्त केली. त्याबाबत सुखदरे यांना कोणतीही माहिती दिली नाही. त्यानंतर शहा याने सुखदरे यांच्या खोट्या सह्या करून बनावट खरेदीखत तयार केले व त्याची कर्जत रजिस्टर कार्यालयात नोंदणी केली. त्याद्वारे सुखदरे यांची जमीन स्वतःच्या नावावर करून घेवून एमआयडीसीला विकली. याबाबत सुखदरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून योगेंद्र शहा विरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.

(छाया : महेंद्र खैरे)





# बोर्ली परिसरात अतिवृष्टी

## बाजारपेठ पाण्याखाली; साळाव चेकपोस्टजवळ दरड कोसळली

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील येसदे, साळाव, सुरई परिसरात सोमवारी रात्री मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे बोर्ली बाजारपेठ पाण्याखाली गेली, त्यात व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. साळाव चेकपोस्ट येथे रात्रीच्या सुमारास दरड कोसळली, तर येसदे ते शिरगाव या मुख्य रस्त्यावर पाणी व मातीचा चिखल झाला.

येसदे, साळाव, सुरई डोंगर भागात सोमवारी (दि. ६) रात्री ११ वाजल्यापासून मंगळवारी पहाटे ४ वाजेपर्यंत प्रचंड अतिवृष्टी झाली. बोर्ली बाजारपेठत पावसाचे पाणी घुसले. या बाजारपेठेत सुमारे सहा फूट पाणी होते. बाजारपेठेतील सर्वच दुकानात पाणी शिरल्याने हाहाकार उडाला, दुकानातील फ्रिज, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, झेरॉक्स मशीन आदीचे मोठे नुकसान झाले. हॉटेल व्यावसायिकांनाही नुकसानीचा जबर फटका बसला आहे. दुकानातील धान्य, कडधान्य, तेल, कांदे, बटाटे आदी जीवनाश्यक वस्तूंचे नुकसान झाले. मंगळवारी पहाटे पावसाचा जोर कमी झाल्यानंतर पाणी ओसरण्यास सुरूवात झाली.

या पुरात बोर्ली बाजारपेठची पुरती वाताहत झाली. गावाच्या परिसरात अनेक ठिकाणी भराव झाल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा होऊ शकला नाही. पाणी वाहून जाण्याच्या मार्गात अनेक बांधकामे नव्याने झाल्याने बोर्ली बाजारपेठेत पाणी घुसले असल्याची तक्रार येथील व्यापारी करतात.

पावसाच्या पाण्यासह माती शिरगाव ते बोर्ली या मुख्य रस्त्यावर आली. त्यामुळे या रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले. या वेळी परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. मोबाइल टॉवर तुटल्याने बाहेरील लोकांशी संपर्क करणे कठीण झाले होते.

बोर्लीचे सरपंच डॉ. चेतन जावसेन यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसह व्यापारी व दुकानदारांशी संपर्क केला व तातडीने पंचनाम्यास सुरुवात केली. बोर्ली बाजारपेठ व गावातील १७५ जणांचे नुकसान झाल्याचे पंचनामे करण्यात आले असल्याचे डॉ. जावसेन यांनी सांगितले.

साळाव चेकपोस्टनजीक दरड कोसळून रात्री ११च्या सुमारास डोंगरातील माती पाण्यासह वाहत आल्याने साळाव चेकपोस्ट-रोहा आणि साळाव चेकपोस्ट ते मुरूड रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला होता.

साळाव चेकपोस्ट पोलिसांनी तत्काळ रेवदंडा पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. त्यानंतर रेवदंडा पोलीस ठाण्याचे निरिक्षक अशोक थोरात, उपनिरिक्षक विनोद चिमडा, मुरूड तहसीलदार गोविंद वाकडे, नायब तहसीलदार रवींद्र सानप तातडीने घटनास्थळी दाखल झाले. साळाव येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यावर आलेली माती बाजूला करून दोन्ही बाजूकडील मार्ग वाहतुकीस खुले केले. शिरगाव नजीकच्या मुख्य रस्त्यावरही चिखलाचे साम्राज्य झाले होते, मात्र वाहतूक सुरळीत सुरू होती.

### गणेशभक्तांचा प्रवास निर्विघ्न होण्यासाठी

# रायगड पोलीस सज्ज

**महामार्गावर १३ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे**

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास निर्विघ्न पार पडावा, यासाठी रायगड पोलीस सज्ज झाले आहेत. मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी जादा पोलीस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. याशिवाय या महामार्गावर १३ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे



बसविण्यात आले आहेत. महामार्गावर रायगडच्या हद्दीत गणेशभक्तांच्या मदतीसाठी १३ ठिकाणी मदत केंद्रांची स्थापना केली जाणार आहे.

गणेशोत्सवासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पालघर येथून लाखो चाकरमानी दरवर्षी कोकणात येतात. वाहनांची संख्या अचानक वाढल्याने मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते. गणेशभक्त वाहतूक कोंडीत अडकू नयेत म्हणून रायगड पोलिसांनी यंदा विशेष उपाययोजना केल्या आहे.

गणेशोत्सव काळात वाहतूक नियमनासाठी आठ उपविभागीय पोलीस अधिकारी, १४ पोलीस निरीक्षक २१ सहाय्यक पोलीस निरीक्षक, २७४ पोलीस कर्मचारी तैनात केले जाणार आहेत. त्यांच्या मदतीला १०० स्वयंसेवक असणार आहेत. वाहतूक कोंडी झाल्यास पर्यायी मार्गांचा अवलंब करण्याच्या सूचनाही त्यांना दिल्या जाणार आहेत.

महामार्गावर गणेश भक्तांच्या मदतीसाठी १३ ठिकाणी मदत केंद्रांची स्थापना केली जाणार आहे. या ठिकाणी रुग्णवाहिका आणि क्रेन्स ठेवण्यात येणार आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांची पथकेही सज्ज ठेवली जाणार आहेत. महामार्गावर वाहने बंद पडल्यास ती तातडीने हलविण्यासाठी या मदत केंद्रांवर यंत्रणा तयार ठेवली जाणार आहे. प्रत्येक मदत केंद्रावर एक पोलीस अधिकारी उपस्थित असणार आहे.

रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या हद्दीतील पेण, वडखळ, गणेश चौक पाली, वाकण फाटा, कोलाड नाका, इंदापूर, माणगाव शहरात तीन ठिकाणी, लोणेरे, राजेवाडी फाटा, पोलादपूर या १३ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक कार्यालयातून या सर्व ठिकाणांवरील वाहतुकीच्या परिस्थितीवर थेट नजर ठेवली जाणार आहे. वाहतूक कोंडी उद्भवल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयातून थेट कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात येणार आहेत.

**गणेशोत्सव काळात मुंबई-गोवा महामार्गावरील अवजड वाहतूक नियंत्रित केली जाणार आहे. गरज भासल्यास वाहतूक इतर मार्गांवर वळविण्याच्या दृष्टीने नियोजन केले आहे. राज्य परिवहन महामंडळालाही बसेस स्थानकात नेऊ नयेत, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.**

**-अशोक दुधे, पोलीस अधीक्षक, रायगड**



# पोलादपूर तालुक्यात खोट्या नोटांचा शिरकाव

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील लोहारे येथील मटणविक्रेत्याच्या गल्ल्यात अज्ञात ग्राहकाने दिलेली पाचशे रुपयांची खोटी नोट आढळल्याने सणासुदीच्या काळात खोट्या नोटांचा बाजारात शिरकाव होण्याची शक्यता आहे.

पोलादपूर तालुक्यातील लोहारे येथील दीपक घोडके यांच्या शॉपमध्ये रविवारी मटण खरेदी करण्यासाठी अनेकांनी गर्दी केली होती. त्यात अज्ञात ग्राहकाने मटण खरेदी करून दिलेली पाचशे रुपयांची नोट बनावट असल्याचे रात्री गल्ला मोजताना निदर्शनास आले. घोडके यांनी पोलादपूर येथील बँक ऑफ इंडियामध्ये संपर्क साधून सदरची नोट खोटी असल्याची खातरजमा केली. यानंतर त्यांनी आगामी सणासुदीच्या काळात खोट्या नोटांचा सुळसुळाट होण्याच्या शक्यतेमुळे लोकांनी सतर्कतेचे आवाहनदेखील केले.

# जुन्या माणगाव रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव व सिद्धीनगर येथील रस्त्यांची डागडुजी गणेशोत्सवापूर्वी करण्यात यावी, अशी मागणी भाजप महिला मोर्चाच्या माणगाव तालुकाध्यक्षा शर्मिला सत्वे यांनी केली होती. त्याचे वृत्त 'दै. रामप्रहर'मध्ये सोमवारी प्रसिद्ध होताच नगरपंचायतीने मंगळवारी (दि. ७) सकाळी जुने माणगाव येथील रस्त्याच्या डागडुजीचे काम सुरू केले आहे.

रामप्रहर इम्पॅक्ट

नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव व सिद्धीनगर येथील रस्त्यांची खड्डे पडून दुरवस्था झाली होती. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात भाविकांच्या आनंदात विघ्न येऊ नये याकरिता भाजप महिला मोर्चाच्या माणगाव तालुकाध्यक्षा शर्मिला सत्वे यांनी गणेशोत्सवापूर्वी या रस्त्यांची डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी केली होती. त्याचे वृत्त 'दै. रामप्रहर'मध्ये सोमवारी प्रसिद्ध झाले होते. त्याची दखल घेत माणगाव नगरपंचायतीने मंगळवारी सकाळी जुने माणगाव रस्त्याच्या डागडुजीचे काम सुरू केले.

दरम्यान, रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत आवाज उठविणाऱ्या भाजपच्या शर्मिला सत्वे आणि 'दै. रामप्रहर'चे या भागातील ग्रामस्थांनी विशेष आभार मानून त्यांना धन्यवाद दिले.

# जिल्ह्यात एक लाख ७६ हजार लसींचा पुरवठा

## आरोग्य प्रशासनाकडून पहिल्यांदाच ३५ ग्रामपंचायतींसाठी लसीची मात्रा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कोविड लसीकरण मोहीम जोरदार सुरू आहे. जिल्ह्यात मंगळवारी (दि. ७) एक लाख ७६ हजार लसीचा साठा उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यातील ३५ लसीकरण मान्य ग्रामपंचायतींना पहिल्यांदाच प्रत्येकी २०० लसीचा पुरवठा आरोग्य विभागाकडून केला जाणार आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांनी दिली.

जिल्ह्यात आलेल्या लसींचे वितरण करण्यात आले असून दोन दिवसांत ही लसीकरण मोहीम पूर्ण केली जाणार असल्याचे डॉ. मोरे यांनी म्हटले आहे. ज्या ग्रामपंचायतीची यंत्रणा लसीकरण करण्यास तयार आहे त्या ३५ ग्रामपंचायतींमध्ये लसीकरण मोहीम राबविली जाणार आहे.


कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम जिल्ह्यात वर्षभरापासून सुरू आहे. आतापर्यंत १३ लाख ८९ हजार १८३ जणांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. मंगळवारी जिल्ह्याला एक लाख ७६ हजार लसींचा साठा उपलब्ध झाला आहे. दोन दिवसात हे लसीकरण पूर्ण करणार असल्याने त्यादृष्टीने आरोग्य विभागाकडून जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रात लसीचे वितरण करण्यात आले आहे. गणेशोत्सव काळात आलेला हा लसीचा साठा फायदेशीर ठरणार आहे.

रायगड जिल्ह्यात आरोग्य विभागामार्फत लसीकरण मोहीम सुरू असली, तरी खाजगी लसीकरणही जोरदार सुरू आहे. काही ग्रामपंचायतीमार्फत खाजगी लसीकरण मोहीम स्वतः च्या पातळीवर सुरू आहे, मात्र प्रशासनाकडून अद्यापही ग्रामपंचायत स्तरावर लसीचा साठा देण्यात आला नव्हता, मात्र आता आलेल्या पावणेदोन लाख लसीच्या साठ्याच्या अनुषंगाने ग्रामपचायतींनाही लस पुरवठा केला जाणार आहे.

रायगड जिल्ह्यातील ३५ ग्रामपंचायतींना प्रत्येकी २०० लस पुरवठा केला जाणार आहे. यासाठी ३५ ग्रामपंचायतींनी पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यात पहिल्यांदाच ग्रामपंचायतीला प्रशासनाने लस उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील इतर ग्रामपंचायतींनीही गावातील नागरिकांच्या लसीकरणासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

**लसीकरणमान्य तालुक्यातील ग्रामपंचायती**

- **अलिबाग तालुका :- चेंढरे, खानाव, वरसोली, पोयनाड, मापगाव, वाडगाव, बेलकडे, माणकुळे, आक्षी, शहापूर, नागाव, झिराड, खंडाळे (कार्ले), हाशिवरे.**
- **पेण तालुका :- कळंबे, निगडे, कोप्रोली, दुष्मी-खारपाडा, काराव, जिते, रावे**
- **खालापूर तालुका :- वडवळ, सावरोली, चांभाली, मोहपाडा- वसांबे**
- **पनवेल तालुका :- दापोली, पारगाव, कर्नाळा, वावंजे, भाताण, विचुंबे, शिवकर**
- **उरण तालुका :- जसखार, केगाव**
- **माणगाव तालुका :- वारक**
- **कर्जत तालुका :- पिंपळोली**





# 'कोरोनाचे भान ठेवून गणेशोत्सव साजरा करा'

**पेण : प्रतिनिधी**

पवित्र भावनेने आणि कोरोनाचे भान ठेऊन गणेशोत्सव साजरा करा, असे आवाहन पेणच्या उपविभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण यांनी गणेशोत्सव मंडळ सदस्य व भाविकांना केले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पेण पोलीस ठाण्याच्या वतीने शहरातील गांधी मंदिर येथे शांतता समिती व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे सभासद यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत उपविभागीय पोलीस अधिकारी चव्हाण मार्गदर्शन करीत होत्या. कोरोना काळात घातलेल्या निर्बंधांचे प्रत्येकाने काटेकोरपणे पालन करावे, असे त्यांनी या वेळी सांगितले.

शांतता कमिटीच्या सदस्यांनी शहरातील वाहतूक कोंडी, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, तसेच कृत्रिम विसर्जन स्थळी विधिवत विसर्जन करण्याच्या सूचना केल्या. उपस्थित अधिकाऱ्यांनी सर्व व्यवस्था चोख ठेवण्याचे आश्वासन या वेळी उपस्थितांना दिले.

पेणचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी प्रास्ताविक केले. शासनाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम पोलीस खात्याचे असून त्यासाठी नागरिकांचे सहकार्य मोलाचे ठरते. सहकार्याने जे होते ते कायद्याच्या बडग्याने होत नाही. त्यामुळे सर्वांनी सहकार्य करून व कोरोना नियमांचे पालन करून आपला आनंद द्विगुणीत करावा, असे ते म्हणाले.

नायब तहसीलदार सुनील जाधव, नगर परिषदचे प्रशासकीय अधिकारी राजाराम नरुटे, महावितरणचे भूषण जाधव आदींसह शांतता समितीचे सदस्य, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे प्रतिनिधी व नागरिक या बैठकीला उपस्थित होते.


**पनवेल महानगरपालिका**

**महिला व बालकल्याण विभाग**

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत राज्यस्तरावर वैयक्तिक खेळासाठी रक्कम रु. १०,०००/- व संघासाठी रक्कम रु. २५,०००/- तसेच राष्ट्रीय स्तरावर वैयक्तिक खेळासाठी रक्कम रु. २५,०००/- व संघासाठी रक्कम रु. ५०,०००/- मात्र एवढी आर्थिक मदत मुलींना क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या खेळासाठी देणेचे प्रस्तावित केले असून याकामी आवश्यक नमुन्यातील अर्ज महिला व बालकल्याण विभागात उपलब्ध करून दिला जाईल. सदर योजनेचा लाभ दिनांक ०१/०१/२०२१ नंतर राज्य व राष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या खेळासाठी **(वैयक्तिक व सांघिक)** विद्यार्थिनीसाठी असेल. सदर कामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात दिल्यानंतर प्रथम येणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल. सदरचा अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक १५/१०/२०२१ पर्यंत असेल. मुदतीनंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

**टिप -**

१. लाभधारक महानगरपालिका क्षेत्रात किमान ३ वर्ष वास्तव्य असल्याबाबतचा पुरावा म्हणून (उदा. रेशन कार्ड/निवडणूक ओळखपत्र, आधार कार्ड, मालमत्ता कर भरल्याची पावती, ३ वर्षाचा भाडेकरारनामा, जन्मदाखला/पासपोर्ट इ.) सादर करावा.
२. वैयक्तिक किंवा सांघिक लाभ घेणारे खेळाडू पनवेल महानगरपालिका क्षेत्राच्या शाळेत किंवा महाविद्यालयात शिकणारे असावे. सदरचा लाभ हा एकदाच मिळेल.
३. शाळा व महाविद्यालय यांचे संमतीपत्र असावे.
४. राष्ट्रीयकृत बँकेमध्ये अर्जदाराच्या नावे असणाऱ्या बँक खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक राहील.
५. आधारकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक राहील.
६. सदरची मदत ही पुढील क्रीडा कामगिरीमध्ये खंड पडू नये अशा स्वरुपाची असेल.
७. मा. नगरसेवक/मा. नगरसेविका यांचे पत्र दाखल केलेल्या अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.
८. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने लाभ देणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार आयुक्त यांना राहील.

**जा.क्र.पमपा/मबाक/३१२१/प्र.क्र.२/जा.क्र. ७२/२०२१**
**दिनांक :- ६/९/२०२१**

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**सहाय्यक आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट 'अ'मध्ये वर्णन केलेला भूखंड प्रस्तावित श्री. पुंडलिक बाळू पावणेकर २. श्रीमती गणाबाई गवत्या म्हात्रे ३. श्री. शिवदास सदू पावणेकर ४. श्री. विश्वास सदू पावणेकर ५. श्री. पंडीत सदू पावणेकर ६. श्रीमती फशीबाई कृष्णा कडव ७. श्रीमती शारदा अनंता फडके ८. श्री. प्रकाश बारकू म्हात्रे ९. श्री. भालचंद्र बारकू म्हात्रे १०. श्रीमती गिरजा रोहिदास पावणेकर यांच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील असून आमचे पक्षकार यांनी सदर भूखंड विकसनासाठी घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर भूखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेणेकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर भूखंडचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**परिशिष्ट 'अ'**

**भूखंड वर्णन**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| कामोठे | सी-६१ | ४७ | २५० |

प्राप्त परिस्थिती वरील परिशिष्ट 'अ' नमूद भूखंडमध्ये वा कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचे कसल्याची प्रकारचे करारमदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, समजोता करार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क हितसंबंधांचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे. वरील कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणताही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंड विकसनाचे काम सुरु करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत, असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**दिनांक : ०७/०९/२०२१**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**ॲड. कांचन एस. पाटील**
**बी.ए.एल.एल.बी.**
**पत्ता :- १३३७ बी, रुम नं. २, शिवाजी पाटील निवास, प्रभूआळी, जुने पनवेल, जि. रायगड ४१०२०६.**
**फोन : ८६८९८०९८९६, ८९०८८८२६११**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E -TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender fees Rs.500/-+ GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No : 7000020862** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-47/2021-2022.** RFx e-tender for work of AMC for Repair/Service/Overhauling/ Problem attending of Compressor of 245/145kV Circuit Breaker at various substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Limited to Rs.5,00,000/- EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **07.09.2021, 17:00 Hrs. to 14.09.2021, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 14.09.2021 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **15.09.2021 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website : **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**(M. C. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**



**सागर सम्राट सहकारी पतपेढी मर्यादित**

नों.क्र. : आर.जी.डी./(पी.डब्ल्यू.एल.)/आर.एस.आर./(सी.आर.)/५००२/८७-८८/सन १९८८
**कार्यालय : ओ.एन.जी.सी. कॉलनी, फेज-१, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**

जा.क्र. SSSP/2020-21/21 दिनांक ०७/०९/२०२१

**जाहीर सूचना**

सागर सम्राट सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा कोविड संदर्भीय निकषांनुसार ऑनलाईन घेणे प्रस्तावित असल्यामुळे संस्थेच्या सभासदांची सभा ऑनलाईन घेण्यात येणार आहे. संस्थेच्या सभासदांनी आपला सध्या अस्तित्वात असलेला भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेल आय.डी. संस्थेकडे दिनांक १५.०९.२०२१ पर्यंत जमा करावेत. जेणेकरून संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ऑनलाईन घेणे सोईस्कर होईल.

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सागर सम्राट सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

# टीम इंडिया सुसाऽऽट!

## ऐतिहासिक विजयानंतर ‘डब्ल्यूटीसी’मध्ये अग्रस्थानी



**दुबई : वृत्तसंस्था**

भारताने इंग्लंडविरुद्ध ओव्हल कसोटी जिंकून जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या दुसऱ्या हंगामात पाकिस्तानला मागे टाकले आहे. विराटसेनेकडे आता पहिल्या क्रमांकाची खुर्ची आहे. भारताने पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना १५७ धावांनी जिंकला. या संस्मरणीय विजयाच्या आधारावर भारताला २६ गुण आणि ५४.१७ अशी टक्केवारी मिळाली. यामुळे भारताने अव्वल स्थान मिळवले.

पॉईंट टेबलमध्ये प्रत्येकी १२ गुणांसह भारतापाठोपाठ पाकिस्तान आणि वेस्ट इंडिज आहे. दोघांना ५० टक्के गुण आहेत. इंग्लंड १४ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. इंग्लंडच्या गुणांची टक्केवारी पाकिस्तान आणि वेस्ट इंडिजच्या तुलनेत केवळ २९.१७ अशी आहे.

प्रत्येक कसोटी सामन्यात विजयासाठी १२ गुण दिले जातात. सामना गमावणाऱ्या संघाला कोणतेही गुण मिळत नाहीत. दुसरीकडे जर आपण गुणांच्या टक्केवारीबद्दल बोललो, तर जिंकण्यावर १०० टक्के, टायवर ५० टक्के आणि ड्रॉवर ३३.३३ टक्के मिळतात.

ओव्हल कसोटीच्या निकालापूर्वी भारत आणि इंग्लंड या दोघांनाही संथ गतीमुळे २-२ गुण गमवावे लागले. या कारणास्तव तीन कसोटी सामन्यांनंतर दोघांचे १४ गुण होते. इंग्लंडला चौथ्या सामन्यात पराभवाला सामोरे जावे लागले. यामुळे त्यांचे फक्त १४ गुण असतील, परंतु भारताला गुणांचा फायदा आहे. भारतीय संघ जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या पहिल्या हंगामाचा उपविजेता संघ आहे. न्यूझीलंडने भारताला हरवून जेतेपद पटकावले होते.

## पॅरालिम्पिकपटूंचे जल्लोषात स्वागत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टोकियो पॅरालिम्पिकमध्ये विक्रमी कामगिरी केल्यानंतर नेमबाज अवनी लेखारा आणि बॅडमिंटनपटू प्रमोद भगत यांच्यासह भारतीय खेळाडूंची अखेरची तुकडी सोमवारी मायदेशी परतली. त्यांचे नवी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर चाहते आणि कुटुंबीयांनी जल्लोषात स्वागत केले. भारताने यंदाच्या पॅरालिम्पिक स्पर्धांत विक्रमी कामगिरी करताना पाच सुवर्णपदकांसह एकूण १९ पदकांची कमाई केली.



टोकियो पॅरालिम्पिकची रविवारी सांगता झाल्यावर सोमवारी भारतीय खेळाडूंचे मायदेशी आगमन झाले. भारतात दाखल होणाऱ्या अखेरच्या तुकडीत बॅडमिंटन, नेमबाजी आणि रिकर्व्ह तिरंदाजी क्रीडा प्रकारांतील खेळाडूंचा समावेश होता. पॅरालिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी पहिली महिला क्रीडापटू अवनी लेखारा, सुवर्णपदक विजेते प्रमोद भगत आणि कृष्णा नागर, रौप्यपदक जिंकणारा सुहास यथिराज, तसेच सिंहराज अधाना आणि मनीष नरवाल या सुवर्णपदक विजेत्या नेमबाजांसह अन्य खेळाडूंची झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी गर्दी केली होती.

## आरोग्य प्रहर

### लिंबू पाणी वजन कमी करण्यासाठी फायदेशीर

लॉकडाऊनच्या काळात अनेक जण वर्क फ्रॉम होम करत असल्यामुळे स्वतःच्या आरोग्याकडे सर्वांचंच दुर्लक्ष होत आहे. त्यातच सतत एका जागी तासन्‌तास बसून बहुतांश जण लठ्ठपणाच्या समस्येचा सामना करत आहेत. वाढणारे वजन ही तशी सर्वांसाठीच डोकेदुखी. वाढणारे वजन कमी करण्यासाठी अनेक जण अतोनात प्रयत्न करत असतात. बाजारात मिळणारी औषधे, जिममध्ये घाम गाळणे, घरगुती उपचार, डाएट प्लान यांसारखे अनेक उपाय केले जातात.



आपल्या सर्वांना माहीतच आहे की, लिंबू पाणी आपल्या शरीरातील पचनसंस्था सुधारण्याचे काम करते. त्याचबरोबर आपल्या शरीराला असणारी व्हिटॅमिन्स आणि मिनरल्सची गरजही लिंबू पाणी पूर्ण करते. तज्ज्ञांच्या मते, योग्य प्रमाणात पाणी प्यायल्याने वाढलेले वजन कमी करण्यासाठी मदत होते आणि त्यातल्या त्यात लिंबामधील गुणधर्म पोटावरील फॅट्स कमी करण्याचे काम करते. लिंबामध्ये फायबर, पोटॅशिअम, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी-६, पेक्टिन आणि सायट्रिक ॲसिड असते. फ्री रेडिकल्सविरोधात संरक्षण करण्यासोबतच ॲन्टीऑक्सिडंट्स हृदयाचे आरोग्य उत्तम राखण्यास फायदेशीर ठरतात. त्याचबरोबर आपल्याला कॅन्सरसारख्या आजारापासून सुटका मिळू शकते.

लिंबू पाण्यात शरीराला आवश्यक असणारी अनेक पौष्टीक तत्त्व असतात. तसेच यापैकी काही पौष्टीक तत्त्व वजन कमी करण्यासाठीही फायदेशीर ठरतात. यामध्ये पेक्टिन असते. ज्यामुळे सतत लागणाऱ्या भुकेवर नियंत्रण मिळवणे शक्य होते. लिंबातील फ्लेवोनॉयड्स शरीरातील मेटाबोलिज्म वाढवतात. मेटाबोलिज्म वजन कमी करण्यासाठी मदत करते. दररोज लिंबू पाणी प्यायल्याने शरीराची सूजही कमी होते. तसेच शरीरातील टॉक्सिन्स बाहेर टाकण्याचे कामही लिंबू पाणी करते. लिंबामध्ये पोटॅशियम असते, ज्यामुळे ब्लड प्रेशर नियंत्रित राहण्यास मदत होते.

दररोज सकाळी लिंबू पाणी प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात. त्यासाठी पाणी घ्या त्यामध्ये एक चमचा लिंबाचा रस एकत्र करा. वजन कमी करण्यासाठी त्यात एक चमचा जिऱ्याची पूडही एकत्र करू शकता. त्यानंतर या मिश्रणाला एक उकळी घ्या. पाणी गाळून त्यात एक चमचा मध घाला.

## जागतिक शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी अलिबागचा सचिन पाटील भारतीय संघात



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय शरीरसौष्ठव विश्व आता आगामी १२व्या जागतिक शरीरसौष्ठव अजिंक्यपद स्पर्धेसाठी पूर्ण ताकदीनिशी सज्ज होतोय. कोरोनाच्या संकटामुळे अनेकदा लांबणीवर पडलेली स्पर्धा येत्या १ ते ७ ऑक्टोबरला उझबेकिस्तानच्या ताश्कंद शहरात होत असून या स्पर्धेसाठी भारताचा ७७ सदस्यीय चमू निवडण्यात आला आहे. त्यात महाराष्ट्राच्या सचिन पाटील, सुजन पिळणकर, सुभाष पुजारीसारख्या तयारीतील खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

गेल्या वर्षापासून कोरोना महामारीमुळे १२वी जागतिक शरीरसौष्ठव स्पर्धा अनेकदा पुढे ढकलण्यात आली. दिवसेंदिवस कोरोनाच्या गहिऱ्या होत असलेल्या संकटामुळे गतवर्षीच्या सर्व स्पर्धा रद्द करण्यात आल्या होत्या, परंतु आता जागतिक शरीरसौष्ठव संघटनेच्या अथक परिश्रमानंतर उझबेकिस्तानच्या ताश्कंद शहरात स्पर्धेची जागतिक दर्जाची तयारी सुरू करण्यात आली आहे. अनंत अडचणींवर मात करीत ही स्पर्धा होत असून या स्पर्धेच्या तयारीसाठीही खेळाडूंना फार कमी वेळ मिळाला होता. त्या वेळेतही खेळाडूंनी प्रचंड मेहनत घेत स्पर्धेसाठी तयारी करण्याचे धाडस दाखविले. जागतिक स्पर्धेसाठी भारतातून मोठ्या संख्येने खेळाडू तयारी करीत असल्याची माहिती भारतीय शरीरसौष्ठव संघटनेच्या सरचिटणीस हिरल शेठ यांनी दिली.

स्पर्धेच्या आयोजनाबाबत साशंकता असल्यामुळे काही ओळखीची नावे निवड चाचणी स्पर्धेतून गायब होती. असे असले तरी काही खेळाडूंनी आपले सर्वस्व पणाला लावत स्पर्धेच्या तयारीसाठी स्वतःला झोकून दिल्याचे दिसून आले. त्यात अलिबागच्या सचिन पाटीलचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. अवघ्या तीन महिन्यांत सचिनने फिटनेस फिजीक गटासाठी स्वतःला तयार केले आहे, तसेच तो ॲथलिट फिजीक या प्रकारातही आपली पीळदार शरीरयष्टी दाखवणार आहे. त्याचप्रमाणे माजी मुंबई श्री विजेता सुजन पिळणकरही ८५ किलो वजनीगटात आपले कसब पणाला लावणार आहे.

## आता मिशन मँचेस्टर!


### पाचवी कसोटी जिंकून इतिहास घडविण्यासाठी टीम इंडिया उत्सुक

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्ड क्रिकेट मैदानावर खेळला जाईल. टीम इंडिया सध्या मालिकेत २-१ने आघाडीवर आहे. आता भारताला मँचेस्टरच्या मैदानावर खेळावे लागेल जिथे त्यांनी आतापर्यंत एकही कसोटी जिंकलेली नाही.

नॉटिंगहॅममध्ये खेळलेला पहिला सामना अनिर्णित राहिला. यानंतर टीम इंडियाने लॉर्ड्सवर जबरदस्त विजय नोंदवला. भारतीय संघाला लीड्समध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. यानंतर चौथ्या सामन्यात विराट कोहलीच्या सैन्याने शानदार पुनरागमन केले आणि ओव्हल कसोटी जिंकली.

पाचवा कसोटी सामना १० ते १४ सप्टेंबरदरम्यान खेळला जाईल. जरी भारतीय संघ हा सामना हरला तरी ते



मालिका गमावणार नाहीत, पण टीम इंडियाला विजय मिळवण्यासाठी खूप प्रयत्न करेल. २००७पासून भारतीय संघ इंग्लंडच्या भूमीवर कसोटी मालिका जिंकलेला नाही. इंग्लंडने विजय मिळवल्यास मालिका २-२ अशी बरोबरीत सुटेल. भारताने आतापर्यंत मँचेस्टरमध्ये नऊ कसोटी सामने खेळले आहेत. यादरम्यान त्यांना २०१४मध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. पाच सामने अनिर्णित राहिले आहेत.

मँचेस्टरमध्ये २०१४मध्ये महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाला येथे एका डावाने पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे विराट कोहली आणि कंपनी बदला घेण्यास नक्की उत्सुक असेल.

### ...तर इतिहास घडेल!

जर भारतीय संघाने मँचेस्टरमध्ये विजय मिळवला, तर ते इतिहास घडवतील. टीम इंडिया १९३६मध्ये पहिल्यांदा या मैदानावर खेळायला आली होती. त्यानंतर ती सामना अनिर्णित करण्यात यशस्वी झाली. त्या वेळी इंग्लंडमध्ये बरोबरी मिळवणे विजयाएवढे मानले जात होते. यानंतर १९४६मध्ये खेळलेली कसोटीही अनिर्णित राहिली. १९५२मध्ये भारताला येथे पहिला पराभव मिळाला.

## उरणच्या अमेघा घरतची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**चिरनेर : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील खोपटे गावची सुकन्या अमेघा अरुण घरत हिने राज्यस्तरीय स्टुडंट आलिम्पिक कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. तिची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील कुस्ती स्पर्धेत निवड झाली आहे.



अमेघा घरत हिच्या यशाने उरण तालुक्याची शान वाढवली असून तिचे आचार्य अत्रे कट्टा उरणतर्फे अध्यक्ष धनंजय गोंधळी, उपाध्यक्ष जे. एस. घरत, सचिव रा. ऊ. म्हात्रे यांनी अभिनंदन केले.


## यूएस ओपन : क्रेजिकोव्हा, सबालेंका उपांत्यपूर्व फेरीत

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फ्रेंच ओपन विजेती बाबरेरा क्रेजिकोव्हा आणि द्वितीय मानांकित आर्यना सबालेंका यांनी अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीतील स्थान पक्के केले. पुरुषांमध्ये डॅनिल मेदवेदेव, फेलिक्स अलिसीमे यांनी दमदार विजयाची नोंद केली.

महिला एकेरीत चेक प्रजासत्ताकच्या आठव्या मानांकित क्रेजिकोव्हाने स्पेनच्या नवव्या मानांकित गर्बिन मुगुरुझाला ६-३, ७-६ (७-४) असे पराभूत केले. बेलारूसच्या सबालेंकाने १५व्या मानांकित एलिस मर्टेन्सला ६-४, ६-१ अशी धूळ चारली. उपांत्यपूर्व फेरीत क्रेजिकोव्हा आणि सबालेंका आमनेसामने येतील. युक्रेनच्या पाचव्या मानांकित एलिना स्विटोलिनाने सिमोना हॅलेपवर ६-३, ६-३ अशी मात केली.

पुरुष एकेरीत रशियाच्या दुसऱ्या मानांकित मेदवेदेवने डॅन इव्हान्सवर




६-३, ६-४, ६-३ असे वर्चस्व गाजवले. कॅनडाच्या १२व्या मानांकित फेलिक्सने अमेरिकेच्या फ्रान्सेस टिआफोवर ४-६, ६-२, ७-६ (८-६), ६-४ अशी सरशी साधली. बोटिक व्हॅन डी झँडशूल्पने १०व्या मानांकित दिएगो श्वार्टझमनवर ६-३, ६-४, ५-७, ५-७, ६-१ असा संघर्षपूर्ण लढतीत विजय मिळवला.

## पंतप्रधान मोदींच्या फोटोद्वारे सेहवागकडून इंग्लंडवर निशाणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडमध्ये सुरू असणाऱ्या कसोटी मालिकेमध्ये सोमवारी भारताने ऐतिहासिक विजय मिळवला. ५० वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर ओव्हलवर भारताच्या विजयाची क्रांती घडली. या विजयानंतर भारतीय संघावर कौतुकाचा वर्षाव होत असतानाच माजी क्रिकेटपटू विरेंद्र सेहवागने केलेले एक ट्विट सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत असून त्याने या विजयाचा आनंद शेअर करताना इंग्लंडला ट्रोल करण्यासाठी चक्क पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोटो वापरला आहे.

मुंबईकर अष्टपैलू शार्दूल ठाकूरसह (२/२२) अन्य गोलंदाजांनी केलेल्या अप्रतिम कामगिरीच्या बळावर भारताने चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात इंग्लंडचा १५७ धावांनी धुव्वा



उडवला. यापूर्वी १९७१मध्ये अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारताने ओव्हलवर इंग्लंडला धूळ चारली होती. यंदा विराट कोहलीच्या शिलेदारांनी हा पराक्रम करताना पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. भारताने दिलेले ३६८ धावांचे लक्ष्य गाठताना इंग्लंडचा दुसरा डाव २१० धावांत आटोपला. भारताच्या दुसऱ्या डावातील शतकवीर रोहित शर्मा सामनावीर ठरला. पाचवी कसोटी १० सप्टेंबरपासून मँचेस्टर येथे खेळवण्यात येणार आहे.

चौथ्या कसोटीतील विजयानंतर कर्णधार विराट कोहलीसह सर्व खेळाडू आणि स्टेडियममधील भारतीय चाहत्यांनी एकच जल्लोष केला. अनेकांनी ट्विटरवरून भारतीय संघाचे कौतुक केले. भारताचा माजी क्रिकेटपटू विरेंद्र सेहवागनेही या सामन्यानंतर काही ट्विट केलेत. एका ट्विटमध्ये संघाचा फोटो पोस्ट करीत सेहवागने पुनरागमन करून सातत्याने जिंकणाऱ्या संघाला भारतीय संघ म्हणतात. भारतीय संघाचा अभिमान वाटतोय, असे म्हटले आहे.

### आप लोग रोना बंद किजिये!

या ट्विटसोबतच सेहवागने अन्य एका ट्विटमध्ये इंग्लंडचा संघ आणि त्यांच्या समर्थकांना ट्रोल केले आहे. भारतीय संघ सपाट खेळपट्टीवर चांगली गोलंदाजी करू शकणार नाही असा अंदाज व्यक्त केला जात होता, मात्र भारतीय गोलंदाजांनी हा अंदाज चुकीचा ठरवत इंग्लंडच्या संघाला ऑल आऊट करण्याचा पराक्रम केला. त्यावरूनच टोला लगावताना सेहवागने पंतप्रधान मोदींचा फोटो पोस्ट केलाय. भारतीय संघ फक्त फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्ट्यांवर जिंकू शकतो असा दावा करणाऱ्यांना आता भारतीय संघ हेच सांगू इच्छित असेल, अशी कॅप्शन या फोटोला देण्यात आलीय. या फोटोमध्ये पंतप्रधान मोदी फोनवर बोलताना दिसत असून फोटोवर आप लोग रोना बंद किजिये असे वाक्य लिहिलेले आहे. सेहवागने ट्विट केलेला हा फोटो सध्या व्हायरल झालाय. पाच हजार ४००हून अधिक जणांनी हा फोटो रिट्विट करून शेअर केला आहे.

सेहवागने ट्विट केलेला फोटो पंतप्रधानांनी मागील महिन्यात ऑलिम्पिकमध्ये थोड्या फरकाने पदक गमावलेल्या भारतीय महिला हॉकी संघाशी संवाद साधतानाचा आहे. पंतप्रधानांनी भारतीय महिला संघाच्या सदस्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल त्याचे अभिनंदन करण्यासाठी फोन केला असता, चौथ्या स्थानावर राहिल्याने पदक हुकल्याच्या दुःखात भारतीय महिला संघाच्या खेळाडूंना रडू आले. त्या वेळी मोदींनी त्यांना रडू नका. तुम्ही फार छान खेळला आहात. आम्हा सर्वांना तुमचा फार अभिमान आहे, असे सांगितले होते. त्यातीलच वाक्याचा सेहवागने उपयोग करीत भारतीय संघाच्या टीकाकारांना चोख उत्तर दिलेय.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com